# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १७/०१/२०१४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १७/०१/२०१४ रोजी सभा सुचना क्र. २३ दि. १०/०१/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. शरद केशव पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शरद केशव पाटील | सभापती |
| २. | श्री. राजु यशवंत भोईर | सदस्य |
| ३. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ५. | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| ६. | श्रीम. मिरादेवी यादव | सदस्या |
| ७. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | सदस्य |
| ८. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ९. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १०. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| ११. | सौ. वंदना मंगेश पाटील | सदस्या |
| १२. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| १३. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| १४. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |

**मा. सभापती :-**

नमस्कार, सर्व सदस्यांचे स्वागत आणि अधिकाऱ्यांचे स्वागत. सचिव साहेब काही अधिकाऱ्यांचे मॅसेज आलेत आणि काही अधिकाऱ्यांनी त्यांनी चांगले काम आणि योग्य कामासाठी मंजुरी घेऊन गेलेले आहेत तर त्यांचे विषय सुध्दा नाही तर सर्व सदस्यांनी त्याची नोंद घ्यावी तसेच सचिव साहेब सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १७/०१/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २३, दि. १०/०१/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय स्थायी समितीका अध्यक्ष का अधिकार नियम के हिसाब से किस अधिकारी को है?

**प्रशांत दळवी :-**

नियमाप्रमाणे स्थायी समितीमध्ये आयुक्तांनी असणे गरजेचे आहे.

**नगरसचिव :-**

आयुक्त प्राधिकृत करेन असा उपायुक्त त्यांच्या वतीने राहु शकेल.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आयुक्त द्वारा प्राधिकृत आपके पास मे लिखित सुचना है की, ढगे साहब आज की बैठक पे आयुक्त द्वारा प्राधिकृत बैठे है या फिर लिखित सुचना है तो इस कंडीशन मे उठकर बैठना कानुन सहमत है।

**नगरसचिव :-**

मा आयुक्तांनी जर पत्र दिलं त्यानंतर बसले तर............

**डॉ. राजेंद्र जैन :-**

पत्र दिया है?

**नगरसचिव :-**

पत्र नही दिया है पत्र मेरे पास नही।

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मै आपसे रिक्वेस्ट करुंगा की, बाकायदा लेखी अधिकारी पत्र लेके उनका प्रतिनीधी यहाँपर बैठे। ताकी यह स्पष्ट हो की जो आयुक्त का प्रतिनिधी है वह सही तरह से सक्षम हो क्योकी, यहाँपर कभी यह अधिकारी तो कभी वह अधिकारी बैठते है तो कंन्टीन्युटी बनती नही है तो कई चीजे पालना, न पालना हो नही पाती है तो दस मिनट के लिए सभा तहकुब की जाए और बाकायदा प्रॉपर लेखी पत्र लेके यह सभा चालू की जाए ऐसी मेरी सुचना है।

**मा. सभापती :-**

ठिक आहे त्यांनी सांगितलं दहा मिनिटासाठी तहकुब पण विषय असा आहे ढगे साहेब की प्रत्येक वेळेला इथे डेप्युटी बदलत असतात आणि ह्या मिनिटाला आपण बसल्यानंतर पुढच्या मिटींगला पानपट्टे साहेब बसले तर गेल्या मिटींगला पानपट्टे साहेब बसले तर गेल्या मिटींगला काय झालं तर पानपट्टे साहेब सांगितलं मला माहित नाही मी नव्हतो बसलो ते बसले होते त्याच्यामुळे त्याचं कोण उत्तर देऊ शकत म्हणुन कमिशनर साहेबांनी तुम्हाला ज्यांना कोणाला इथे नियुक्त करायचं आहे त्यांना पत्र दिलं पाहिजे अथवा स्वतः कमिशनर साहेब इथे येऊन बसले पाहिजे विषय परत असा होतो की सदस्यांनी विचारलेल्या कुठच्याही प्रश्नाचं उत्तर आपण देऊ शकत नाही मला माहित नाही मला माहिती घेऊन बोलायला लागेल आणि जर सदस्यांनी सांगितलेलं इथे जर मंजुर झालं तर ते तुम्ही करायची हमी देता का? कमिशनर साहेबांनी नाही सांगितलं तर मी करुन देईन म्हणुन असं काही होत नाही ना कधी मग त्यावेळेला सगळं कमिशनर साहेबांवर ढकललं जाते की कमिशनर साहेबांनी सांगितलं नाही बरोबर नाही करायला पाहिजे. मग, कमिशनर साहेबांनीच यायला पाहिजे सदस्यांना काय वाटते? त्याच्यामुळे हा प्रॉब्लेम होतो कुठच्याही कामाचं कुठचाही निर्णय आपल्यापर्यंत पोहचतच नाही तर आज कमिशनर साहेब नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

दोन विषय आहेत ह्याच्यामध्ये एक सभाशास्त्र प्रमाणे सचिव साहेब तुमची जबाबदारी आहे आयुक्त साहेब येत नाही तर नेक्स्ट कोण? त्याचं लेखी त्यांच्याकडे येणं गरजेचं आहे हा पहिला भाग लेखी आलचं नाही तर कोणी पण येऊन बसेल अशीच परंपरा चालवायची का? आजच्या सभेने ठरवायचं काय? ही सभा नविन नाही ठरवत म्युनिसिपल ॲक्ट मध्ये क्लीअरकट आहे की नेक्स्ट ह्याला ऑर्डर दिली पाहिजे मग तुम्ही अख्ख्या सभागृहाला गृहित धरता कसं धरता काय? आलं तर ठिक आहे नाही आलं तर ठिक घरी जाऊन सही घेऊ अशा पध्दतीने आपलं सभा चालवायची का? विषय हा आहे कोणावर आरोप दोषारोप नाही सोयी शहराच्या विकासासाठी किंवा व्यक्तीगत काही अडचण आहे हा विषय वेगळा आहे मी परंपरेचा विषय घेतो सभा शास्त्राप्रमाणे कमिशनर जे काम होत सचिवांच ते काम होतं आता तुमच्या समोर हे येऊन बसले समजा ह्या दोघांमध्ये मारामारी झाली तर दोन उपायुक्त मी बसु की तु बसु असं झालं तर काय? असं होत नाही. आपण सगळेच खेळीमेळीने चालतो कोण बसलं तरी आपण सांगु शकतो तुम्ही उठा तुम्ही बसा एवढा आपल्या एकमेकांचा रिश्ता आहे. आम्ही काय समजायला पाहिजे सचिव म्हणुन तुम्ही सांगा सभा शास्त्र तुमच्या हातात आहे सभापती रुलींग देणार पण आता आम्ही काय करायला पाहिजे असंच चालवायचं आज ढगे साहेब बसले जसे सभापती बोलले उद्या पानपट्टे साहेब बसतील परवा आणखीन दुसरे बसतील तेरवा तिसरे बसतील. रिस्पॉन्सीबल आन्सरेबल कोणी नाही असं झालं तर इथे आपण यायचं कशाला? कोणीही सगळ्या पक्षाच्या लोकांनी हा पक्षाचा ह्याचा विषय नाही.

**प्रभात पाटील :-**

काका, दहा मिनिट सभा तहकुब केली आहे ना येणार आहेत का ती माहिती घ्या.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आपको अभी बोलनेका अधिकार है नही क्योकी आप लिखित रुप से ....

**मा. सभापती :-**

बोलने दो ना।

**विलास ढगे (उपायुक्त (मु.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, आता मुद्दा उपस्थित केलेला आहे तो कायद्यातील तरतुदीनूसार रास्त आहे परंतु, मला वाटते सभेच्या कामकाजासाठी नियमित ज्या तरतुदीनुसार स्थायी ऑर्डर यापूर्वी कधी काढलेली आहे का नाही सचिव साहेब? की या या तरतुदीनुसार आयुक्तांच्या अनुपस्थीती मध्ये कोणते अधिकारी हे प्रतिनिधीत्व म्हणुन ते हजर राहतील. स्टँडींग ऑर्डर जे काढलेल्या आहेत त्याच्यामध्ये.........

**नगरसचिव :-**

पूर्वीचे अधिकारी सभागृहात कोणी हजर रहावे त्याच्याबद्दल काढलेले आहेत.

**प्रशांत दळवी :-**

उपायुक्त साहेब, हा सगळा प्रशासनाचा भाग आहे तो तुम्ही नंतर बघा ना. तो का विचारला जातो? आम्ही काय म्हणतो सभापती साहेब तुम्ही एवढच रुलिंग द्या.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

आप जो बोलना चाहते है। आपका बोलने का एकही अर्थ है की, पहले दस गलतीया की है तो अभी वो गलती करने दो ऐसा नही होता।

**विलास ढगे (उपायुक्त (मु.) :-**

ह्याच्यामध्ये दर मिटींगच्या वेळेस कामकाजाची कार्यपध्दती सांगतो आयुक्त हे कार्यालयीन कामकाजाच्या निमित्त आणि कार्यालयीन कामाच्या निमित्ताने जर मिटींगला उपस्थित राहू शकत नसतील किंवा बाहेरगावी गेले असतील तर अशा परिस्थीतीमध्ये कोण प्राधिकृत अधिकारी म्हणून कार्यरत कामकाज ते तिथे हजर राहतील? ह्या स्टँडींग ऑर्डर काढलेल्या नसतील ही त्या बाबतची दखल घेऊन त्याबाबतचा प्रस्ताव देऊन आयुक्त साहेबांचे ऑर्डर काढल्याची तरतुद करण्यात येईल.

**डॉ. राजेंद्र जैन :-**

ॲक्ट मे साफ लिखा हुआ है आयुक्त किंवा उसका प्रतिनिधी................

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही गोल गोल करण्यापेक्षा तुम्ही त्याची अंमलबजावणी केली तर हा प्रश्नच आला नसता आता सगळे सिस्टम आहे हे तुम्हाला जर मान्य आहे की मी नाही करु शकत तर एसएमएस पाठवू शकता सभापतींना सांगा मी येणार नाही हे येतील हा एसएमएस सचिवांना येतो ज्यांना सांगितलेलं आहे जशी तुमची नेमणुक झाली तर तुमच्या नावाचं तुम्हाला एसएमएस येणार की मी नाही तुम्ही बसायचं काहीतरी मेन्टेन ठेवायला पाहिजे की नाही?

**मा. सभापती :-**

ठिक आहे. ही सभा दहा मिनिटासाठी तहकुब करण्यात येते. आपण कमिशनर साहेबांना विचारुन घ्या, कमिशनर साहेब असतील तर बोलवून घ्या, नसतील तर तसं खुलासा करुन घ्या.

**विलास ढगे (उपायुक्त (मु.) :-**

मला त्यांनी मौखिक सुचना दिलेली आहे की, मी मिटींगला उपस्थित राहू शकत नाही तुम्ही उपस्थित रहा.

**मा. सभापती :-**

ठिक आहे दहा मिनिट तहकुब आहे तुम्ही माहिती काढून घ्या असतील तर बोलवून घ्या नसतील तर तुम्ही नंतर उत्तर द्या.

**प्रशांत दळवी :-**

सचिव साहेब, आता दहा मिनिटं नंतर आम्हाला काय तो खुलासा करा.

**मा. सभापती :-**

सभा दहा मिनिटांसाठी तहकुब करण्यात येत आहे.

(मा. सभापतींच्या आदेशाने सभा दहा मिनिटांसाठी तहकुब करण्यात आली.)

**सभा तहकुब झाल्याची वेळ सकाळी ११.२० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**